# महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

CIN:U४०१०९MH२००५HGC१५३६४५

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, ४ था मजला, स्टेशन रोड, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

वेबसाइट :- www.mahadiscom.in ई-मेल:- agmhrmprcell@gmail.com


क्र.मासं/मपुक/030998 दिनांक: 25 SEP 2025

**मपुक कार्यालयीन आदेश क्र.- ७०/२०२५**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कर्मचारी सेवाविनियम अनुसूची क्र.एक मधील अ.क्र."क + ख" व "ट" अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) व संचालक (मासं) यांचेशी विचार विनिमय करुन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी खालील बाबींस मंजूरी दिली आहे.

१. **कल्याण परिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील पालघर लघु मंडळातील पालघर विभागांतर्गत येणाऱ्या पालघर उपविभागाचे विभाजन करून नवीन पालघर (पुर्व) उपविभाग निर्माण करण्यात येत आहे व विभाजनानंतर विद्यमान पालघर उपविभागाचे नामकरण पालघर (पश्चिम) उपविभाग करण्यात येत आहे.**

२. **कल्याण परिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील पालघर लघु मंडळातील पालघर विभागांतर्गत येणाऱ्या पालघर उपविभागाचे विभाजन करून विभाजनानंतर नवनिर्मित पालघर (पुर्व) उपविभाग कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १२ पदे खातेनिहाय पदे मंजूर करण्यात येत आहे. (तक्ता-'अ')**

३. **कल्याण परिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील पालघर लघु मंडळातील पालघर विभागांतर्गत येणाऱ्या पालघर उपविभागाचे विभाजन केल्यानंतर (तक्ता-'ब' ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे पालघर (पश्चिम) व नवनिर्मित पालघर (पुर्व) उपविभाग कार्यालयांतर्गत शाखा कार्यालयांचा समावेश करण्यात येत आहे.**

४. **कल्याण परिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील पालघर लघु मंडळातील पालघर विभागांतर्गत येणाऱ्या पालघर उपविभागातील पालघर (पश्चिम) शाखा कार्यालयाचे विभाजन करून नवीन लोकमान्यनगर शाखा निर्माण करण्यात येत आहे.**

५. **विभाजानंतर नवनिर्मित लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १२ खातेनिहाय पदे मंजूर करण्यात येत आहेत. (तक्ता-'क')**



Scanned with OKEN Scanner

६. विभाजनानंतर विद्यमान पालघर (पश्चिम) शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर ग्रामीण क्षेत्रातील कर्मचारी मानंकानुसार १२ पदे ठेवून वरिष्ठ तंत्रज्ञाचे अतिरिक्त झालेले १ पद व तंत्रज्ञांची अतिरिक्त झालेल्या १० पदांपैकी ३ पदे अशी एकूण ४ पदे नवनिर्मित लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर वळती करण्यात येत आहेत आणि सहाय्यक अभियंता (वितरण) १, प्रधान तंत्रज्ञ १ व वरिष्ठ तंत्रज्ञ ६ अशी एकूण ८ पदे नव्याने निर्माण करण्यात येत आहेत व अतिरिक्त झालेली ७ तंत्रज्ञाची पदे सांघिक कार्यालयाच्या अतिरिक्त पदांच्या संचयनीमध्ये वळती करण्यात येत आहेत. अशाप्रकारे नवनिर्मित लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १२ पदे मंजूर करण्यात येत आहेत.

७. कल्याण परिमंडळाच्या कार्यक्षेत्रातील पालघर लघु मंडळातील पालघर विभागांतर्गत येणाऱ्या विभाजनानंतर नवनिर्मित पालघर (पुर्व) उपविभाग कार्यालयाच्या आस्थापनेवर नव्याने निर्माण कराव्या लागणा-या १२ पदांसाठी रु.१,२६,७३,०९२/- इतका वार्षिक आर्थिक भार व कार्यालय निर्मितीचा प्रशासकीय खर्च रु.५,६२,८००/- मंजुर करण्यात येत आहे.

८. विभाजनानंतर नवनिर्मित लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवरील नव्याने निर्माण केलेल्या ८ पदांसाठीचा खर्च रु.७३,५५,८०८/- इतका वार्षिक आर्थिक भार व कार्यालय निर्मितीचा प्रशासकीय खर्च रु.६०,०००/- मंजुर करण्यात येत आहे.

सदर आदेश महावितरण कंपनीच्या Employee Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned with OKEN Scanner

तक्ता -'अ'

## नवनिर्मित पालघर (पुर्व) च्या कार्यालयाकरीता मंजूर पदांचा तपशिल

| अ.क्र. | उपविभाग | पदनाम | मंजूर पदांचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | उपविभाग कार्यालय प्रमुख | उप कार्य.अभियंता (वितरण) | १ |
| २ | तांत्रिक विभाग | कनिष्ठ अभियंता (वितरण) | १ |
| ३ | आस्थापना विभाग | निम्न. लिपिक (मासं) | १ |
| ४ | वित्त व लेखा विभाग | सहाय्यक लेखापाल | १ |
| | | उच्चस्तर लिपिक (लेखा) | २ |
| | | निम्न. लिपिक (लेखा) | ३ |
| ५ | गुणवत्ता नियंत्रण विभाग | सहाय्यक अभियंता (वितरण) | १ |
| | | मुख्य तंत्रज्ञ | १ |
| ६ | इतर | शिपाई | १ |
| | | एकूण | १२ |

तक्ता - 'ब'

## पालघर उपविभागीय कार्यालयाची विभाजनापूर्वीची शाखा कार्यालये व विभाजनानंतरची शाखा कार्यालये आणि नवनिर्मित पालघर (पुर्व) उपविभागाच्या आस्थापनेवरील शाखा कार्यालये.

| अ.क्र. | विभाजनापुर्वीची पालघर उपविभाग | विभाजनानंतर पालघर (पश्चिम) उपविभाग | (नवनिर्मित) पालघर (पूर्व) उपविभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पालघर (पश्चिम) | पालघर (पश्चिम) | पालघर (पुर्व) |
| २ | पालघर (पुर्व) | **(नवनिर्मित)** लोकमान्य नगर | मनोर |
| ३ | पालघर ग्रामीण | पालघर ग्रामीण | सावरखंड |
| ४ | सातपाटी | सातपाटी | मासवण |
| ५ | माहीम | माहीम | उमरोळी |
| ६ | मनोर | | |
| ७ | मासवण | | |
| ८ | सावरखंड | | |
| ९ | उमरोळी | | |
| एकूण | ०९ | ०५ | ०५ |

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned with OKEN Scanner

तक्ता-'क-'

## विद्यमान पालघर (पश्चिम) शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर मंजुर केलेली पदे

| अ. क्र. | पदनाम | विभाजना पूर्वीची स्थिती (मंजुर पदसंख्या) पालघर (पश्चिम)शाखा | विभाजना नंतरची स्थिती (मंजुर पदसंख्या) पालघर (पश्चिम)शाखा | स्थलांतरीत करावी लागणारी अतिरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सहाय्यक अभियंता | १ | १ | ० | पालघर (पश्चिम)शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवरती कर्मचारी मानंकानुसार अतिरिक्त ठरणारे वरिष्ठ तंत्रज्ञ ०१ पद व तंत्रज्ञ -१० पदापैकी ३ पदे नवनिर्मीत लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर वळती करणे व ७ पदे सांघिक कार्यालयाच्या अतिरिक्त पदांच्या संचयनीमध्ये वळती करणे |
| २ | प्रधान तंत्रज्ञ | १ | १ | ० | |
| ३ | वरिष्ठ तंत्रज्ञ | ८ | ७ | १ | |
| ४ | तंत्रज्ञ | १३ | ३ | ३ | |
| | एकूण | २३ | १२ | ०४ | |

## नवनिर्मीत लोकमान्यनगर शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर निर्माण केलेली पदे

तक्ता 'ड'

| अ. क्र. | पदनाम | (नवनिर्मीत) लोकमान्यनगर शाखा (मंजुर पदसंख्या) | पालघर (पश्चिम)शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवरील स्थलांतरीत करावी लागणारी अतिरिक्त पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सहाय्यक अभियंता | १ | ० | १ |
| २ | वरिष्ठ तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| ३ | प्रधान तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| ४ | वरिष्ठ तंत्रज्ञ | ६ | १ | ५ |
| ५ | तंत्रज्ञ | ३ | ३ | ० |
| | एकूण | १२ | ४ | ०८ |

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned with OKEN Scanner